**प्रति,**
**सन्मा. मुख्याध्यापिका व सहकारी शिक्षकवृन्द यांसी,**
**सविनय सादर प्रणाम!**

शुक्रवार दिनांक ३/२/२०१७ रोजी आपल्या विभागाच्या विज्ञान व कलाप्रदर्शन सोहळयाच्या अतिशय सुंदर अशा उद्घाटन सोहळयास उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

कला प्रदर्शनातील वस्तूंची निवड, उपयुक्तता, रंगसंगती, मुलांच्या आवडीचा कल, कमी खर्चात अधिक उपयुक्तता, विविध राज्यांची, प्रदेशांची, सण – उत्सवाची माहिती यातून संपूर्ण भारताची सैर घडली. मुलांनी बनवलेल्या चप्पल व कपडे यात त्यांचे कौशल्य डोकावत होते. तर निरनिराळया आकाराच्या बॅगा मन आकर्षित करत होत्या. करवंटीपासून बनवलेली पर्स, काडेपेटीच्या काड्यांपासून बनवलेली चप्पल, वारली पेंटींग सारेसारे छान. आनंदीआनंद चोहीकडे पसरवणारी निवेदक मुलेही छान.

विज्ञान प्रदर्शनात प्रवेश करण्याअगोदरच अचंबित व्हायला होते ते इलेक्ट्रीक कर्टन पाहून प्रवेश केल्याबरोबरच हवेचा दाब स्पष्ट करण्याऱ्या प्रयोगापासून जादूचे संत्र पर्यंतचे सर्वच प्रयोग उत्तम. खाण्याच्या चांगल्या सवयी, उपयुक्त अन्न, दातांची निगा, आजीबाईंचा बटवा, खाण्यतील नैसर्गिक पदार्थ (रंग) जलशुद्धिकरण, ठिबकसिंचन साऱ्यातूनच प्रयोग निवडीतील बौद्धिकता, विद्यार्थी व शिक्षकांची मेहनत व कलात्मकता दिसून येते प्रयोगाची माहिती सांगणारी गोडी आवाजाची मुले विशेषतः त्यांची स्वयंशिस्त उल्लेखनीय आहे.

प्रदर्शन पाहताना मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील परस्पर संवादाचा सांधलेला साकव मजबूत वाटला. टिमवर्क उत्तम. शिक्षकांनी प्रदर्शनाची मांडणी व स्वतःचा पेहराव दोन्हीही उत्तमपणे केलाय.

विशेष कौतुक रांगोळी, आणि रांगोळी काढणाऱ्या जादूई बोटांचे. मुलांना घडवताना स्वतःचाही व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या मुख्याध्यापिका शिक्षक व शिक्षकेतक कर्मचारीवर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक

**आपल्यातीलच एक शिक्षिका**
**(श्रीम. मनिषा चौबळ)**